**प्रकल्प प्रवर्तक मे. आंबे आयर्न प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ई-१, एमआयडीसी चिंचोली, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा स्पाँज आयर्न (८२,५००.० टीपीए), हॉट मेटल (१,५९,५००.० टीपीए) आणि रोल्ड प्रॉडक्टस (१,५०,०००.० टीपीए) चे उत्पादन करण्यासाठी विद्यमान डी.आर.आय. युनिटस (१X५० टीपीडी + २ X१०० टीपीडी) च्या पुनरुज्जीवनसहित प्रवर्तन भट्टी ( १ X ४० टन) रोलिंग मिल (१ X२५ टीपीएच) आणि सी.पी.पी. (८.० मेगावॅट) ची उभारणी करुन विद्यमान स्टील प्लँटचे विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

प्रकल्प प्रवर्तक मे. आंबे आयर्न प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ई-१, एमआयडीसी चिंचोली, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांचा स्पाँज आयर्न (८२,५००.० टीपीए), हॉट मेटल (१,५९,५००.० टीपीए) आणि रोल्ड प्रॉडक्टस (१,५०,०००.० टीपीए) चे उत्पादन करण्यासाठी विद्यमान डी.आर.आय. युनिटस (१X५० टीपीडी + २ X१०० टीपीडी) च्या पुनरुज्जीवनसहित प्रवर्तन भट्टी ( १ X ४० टन) रोलिंग मिल (१ X२५ टीपीएच) आणि सी.पी.पी. (८.० मेगावॅट) ची उभारणी करुन विद्यमान स्टील प्लँटचे विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक, २९ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थान भूखंड नं.ई-१, एमआयडीसी चिंचोली, सोलापूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार, दिनांक, २९ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६, सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५२ /२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०७१२-एफटीएस-०१६ दिनांक १२ जुलै, २०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

बैठकीत उपस्थितांनी स्वाक्षरी केलेली यादी **(सहपत्र क्रं.1)** प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप **(सहपत्र क्रं. २)**, समिती गठण आदेश **(सहपत्र 3) सोबत जोडले आहे.**

श्री अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्रीमती शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, शासकीय अधिकारी व कर्मचारी, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि २२ ऑगस्ट, २०१३ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री अजित पाटील, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. आंबे आयर्न प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ई-१, एमआयडीसी चिंचोली, जिल्हा-

सोलापूर, महाराष्ट्र यांचा पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदस्य, आयोजक यांनी प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की सदरहू प्रकल्प हा २००४-२०१४ चांगला चालला. नंतर तोट्यात गेला. नंतर महाराष्ट्र शासनाने सिक युनिट म्हणून घोषित झाले. सहा वर्षे कंपनी बंद होती. नंतर नवीन प्रकल्प प्रवर्तकाने ही कंपनी सीक युनिट म्हणून विकत घेतली. विकत घेतल्यानंतर नवीन प्रकल्प धारकास लक्षात आले की बरीच मशिनरी ही सडलेली, गंजलेली आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पाची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. तर जुनी स्क्रॅप करुन नवीन मशिनरी बसविणार आहेत. मात्र कंपनीत ज्या भट्टया आहेत, त्यांची क्षमता मात्र वाढविणार नाहीत. तिथे लोखंडातील माती वितळणार आहे, तेथील प्रदूषणात वाढ होणार नाही. म्हणजे जेवढे प्रदूषण होणार आहे, त्यात वाढ होणार नाही. त्यामुळे नवीन प्रकल्प प्रवर्तकांनी स्पाँज आयर्न (८२,५००.० टीपीए), हॉट मेटल (१,५९,५००.० टीपीए) आणि रोल्ड प्रॉडक्टस (१,५०,०००.० टीपीए) चे उत्पादन करण्यासाठी विद्यमान डी.आर.आय. युनिटस (१X५० टीपीडी + २ X१०० टीपीडी) च्या पुनरुज्जीवनसहित प्रवर्तन भट्टी ( १ X ४० टन) रोलिंग मिल (१ X२५ टीपीएच) आणि सी.पी.पी. (८.० मेगावॅट) ची उभारणी करुन विद्यमान स्टील प्लँटचे विस्तारिकरण करण्याचे नियोजित केलेले आहे. सदरहू प्रकल्प हा पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये संवर्ग **ए ३ (ए) मध्ये** मोडत असल्याने त्यास पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनवाणी आयोजित करणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि जल वायू परिवर्तन विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १५ जून, २०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र

प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २४ जून, २०२२ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या मराठीतील प्रति सर्व जनतेच्या अवलोकनार्थ शासनाच्या खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेल्या होत्याः-

१) मा. जिल्हाधिकारी कार्यालय - सोलापूर

२) मा. अपर जिल्हाधिकारी कार्यालय - सोलापूर

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सोलापूर

४) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सोलापूर

५) पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५वा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

६) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई - ४०० ०२२

७) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, ३रा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३

८) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर

९) तहसीलदार, तहसील कार्यालय- मोहोळ, तालुका- मोहोळ, जिल्हा - सोलापूर

१०) गटविकास अधिकारी, पंचायत समिती- मोहोळ, तालुका- मोहोळ, जिल्हा - सोलापूर

११) ग्रामसेवक / सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालये - मौजे - चिंचोलीकाटी कोंडी, पाकणी, अकोलेकाटी, दारफळ, कारंबा, केगाव,

१२) मप्रनि मंडळाचे संकेतस्थळ

अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करून व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

आयोजक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर यांना काही सूचना/ आक्षेप प्राप्त झालेले आहे. त्याचप्रमाणे चिंचोलीकाटी ग्रामसभेने ठराव मंजूर केला की सदरहू प्रकल्पास आमची हरकत आहे. चिंचोलीकाटी ग्रामसभेने दि. 04/07/2022 रोजी ठराव मंजुर केला व चिंचोलीकाटी ग्रामपंचायतीने दि. 06/07/2022 रोजी सुनावणीस हरकत असले बाबत पत्र या कार्यालयास पत्र दिले.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले की प्रकल्पात जो प्रदूषणाचा स्त्रोत जेथून उत्पन्न होतो, तेथे प्रदूषणाची पातळी वाढत नाही. अस्तित्वात असलेल्या भट्टीची डागडुजी करणार आहे. त्यामुळे ज्यांना इच्छा आहे, ते प्रकल्पास भेट देऊन जुनी ५० टनाची भट्टी बघू शकता. नवीन सळईचा प्रकल्प ते टाकणार आहेत. कारण ती जुनी प्रणाली झालेली आहे. तसेच नवीन वीजनिर्मिती प्रकल्प टाकणार आहेत. कंपनीत जी वीज निर्मिती होणार, त्यात ते किती वापरणार व किती शासनास देणार याची माहिती सांगावी.

सदस्य आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

श्री पाटील यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

मा. अध्यक्षा यांच्या परवानगीने पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाची संपूर्ण माहिती देताना प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन

- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

अ) आपण प्रकल्पात बांधकाम करत आहात व त्यानंतर कलरींग करणार आहात. तर रंग लावताना नॉन-व्हिओसी (Non-VOC) पेंटचा वापर करण्यात यावा. अशी सूचना आहे,

ब) ज्यावेळी प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA), कार्यकारी सारांश (अहवाल) म.प्र.नि.मंडळ कार्यालयात जो सादर केला, तो सर्व अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेली होती. त्यात ८.० मेगावॅट वीज निर्मिती करणार असा उल्लेख करण्यात आलेला आहे. मात्र सादरीकरणात आपण १४.० मेगावॅट वीजनिर्मिती करणार आहात असा उल्लेख आहे. याबाबत स्पष्टीकरण त्वरित देण्याची सूचना करण्यात यावी.

**प्रकल्प प्रवर्तक यांनी** माहिती दिली की १४ मेगावॅट ही लागणारी वीज आहे. त्यातील ८.० मेगावॅट ही प्रकल्पातच आवश्यक असल्याने ती प्रकल्पातच वापरण्यात येईल. उरलेली वीज हा नियमाप्रमाणे ही शासनास देण्यात येईल.

**सदस्य, आयोजक यांनी** उत्तराने समाधान झाल्याचे सांगितले. आयोजक यांनी पुढे सांगितले की कॅपटिव्ह पॉवर प्लँट जर १५ मेगावॅटपेक्षा कमी असेल , तर त्यास पर्यावरण अनुमती लागत नाही. जर तुम्ही १५ मेगावॅट उत्पन्न केली असती तर ८ मेगावॅट कारखान्यासाठी घेऊन उरलेली विकली असती, तर कारखान्याचा फायदाच झाला असता. आयोजक यांनी सांगितले जर सीपीपी प्रकल्प उभारणी झाली नसल्यास आपण त्याप्रमाणे बदल केल्यास आपल्यालाही दोन पैसे मिळतील व शासनास अतिरिक्त वीज उपलब्ध झाल्याने वीज संकट दूर करण्यास मदत होईल.

क) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात व सादरीकरणात Water Sprinklers वापरणार असल्याचे नमूद केलेले आहे. ती जुनी प्रणाली झाली. तर आता आधुनिक फॉगर टाईप वॉटर स्प्रिकलर्स (Fogger Type Water Sprinklers) वापरण्यात यावेत अशी माझी सूचना आहे. याचा उल्लेख प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. तरी अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्याची नोंद घेण्यात यावी.

ड) **आयोजक यांनी** पुढे आक्षेप नोंदविला की सादरीकरणात व अहवालात कोठेही पर्यावरण कक्ष (Environment Cell) व त्यातील अधिकारी, कर्मचारी यांची काहीही माहिती दिलेली नाही. आयोजक यांनी मत मांडले की बांधकाम सुरु करण्याबरोबरच आपण पर्यावरण व्यवस्थापक (Environment Manager) नियुक्त करणे उचित होते. कारण बांधकाम सुरु होतानाच पर्यावरणाची हानी व्हायला सुरवात होते. तरी वेगळ्या पर्यावरण कक्ष (Environment Cell) व त्यातील अधिकारी व कर्मचारी यांची संपूर्ण माहिती देण्यात यावी. त्यांनी दुसरे काही काम देऊ नये. ही सूचना आहे.

२) **<u>श्री शाहू हनुमंत लामकाने, राहणार-अकोले काटी, तालुका- उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्पात ३६० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळणार आहे. तर त्यात स्थानिकांना किती रोजगाराची संधि देण्यात येणार आहे? प्रकल्पात कुठल्या संवर्गातील लोकांची गरज आहे व किती नियुक्त त्वरित करावे लॉगतील याचा काही डेटा तयार केलेला आहे का?

सदस्य, आयोजक यांनी कुशल (Skilled) अर्धकुशल (Semi-Skilled व अकशुल (Non-skilled) अशी वर्गवारी असते असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत कशी टक्केवारी ठेवलेली आहे याबाबत त्वरित उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की स्थानिक लोकांना प्रकल्पात जशी कामाची गरज आहे, त्या संवर्गात स्थानिक लोकांना कामात प्राधान्य देण्यात येईल.

यावेळी श्री लामकाने यांनी सांगितले की येथे बरेच वाहनचालक असे आहेत की त्यांच्या स्वतःच्या गाड्या असून ते काम घेत असतात. येथे बरेच ट्रकमालक आहेत. त्यांना येथे प्राधान्य देण्यात यावे. प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांनाच प्रथम प्राधान्य देण्यात येईल असे सांगितले.

श्री लामकाने यांनी असे असल्यास प्रकल्पास समर्थन असल्याचे सांगितले

श्री लामकाने यांनी पुढील प्रश्न विचारला की प्रकल्पात जो ईटीपी बांधणार आहेत, त्याची काळजी घेण्यात यावी.

यावेळी सदस्य, आयोजक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी निर्मिती होणार नाही. सदरहू प्रकल्प हा झेडएलडी - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. हा केमिकल कारखाना नाही. येथे प्रकल्पात भट्टी आहे. १४००° ला लोखंड गरम होणार. भट्टीत लोखंड वितळल्यानंतर त्याचे रॉडस, धातू वगैरे तयार करण्यात येतील. त्यात केमिकलचा वापर करत नाही. येथे कुलिंगसाठी पाणी लागेल. ते कुलिंगचे पाणी मेक अप करावे लागते. कुलींगचे पाणी काहीवेळाने/आठ दिवसांनी खराब होते. ते साठवून तर त्याला फिल्टर लावणार. त्याला प्रायमरी ट्रीटमेंट देणार. यावेळी श्री लाकमाने यांनी मागणी केली की प्रायमरी ट्रीटमेंट प्लँट चालवावा. श्री लाकमाने यांनी परिसरातील केमिकल कंपन्यांचा उल्लेख केला. त्यावेळी सदस्य, आयोजक यांनी ही जनसुनावणी ज्या प्रकल्पाची आहे, त्याबाबत सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. केमिकल प्रकल्पात केमिकलचे सांडपाणी तयार होते. या प्रकल्पात पाण्याचा वापर होत नाही. या प्रकल्पात १४०० तापमानला पाण्याचा वापर केल्यास स्फोट होईल. पण कुलिंग करण्यासाठी पाणी लागते, ते झाडांसाठी वापरण्यात यावे.

३) **<u>श्री महेंद्र वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य, चिंचोली काटी, राहणार-चिंचोली काटे, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

आताच सांगण्यात आले की कंपनीत प्रदूषण होत नाही. पण मागच्या महिन्यात कंपनीने बॉयलरची ट्रायल घेतली. नंतर बॉयलरमधून लोखंडी कण हे आमच्या शेतातील पीकांवर पडले होते. संध्याकाळी जर कपडे वाळत टाकले, तर सकाळी कपडे काळे पडलेले असतात.

**सदस्य, आयोजक यांनी** प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा केली की पूर्वपरवानगी नसताना ट्रायल कशी घेतली? त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की कंपनीस म.प्र.नि.मंडळाचे वैध संमतीपत्र असून त्याची मुदत मे, २०२३ पर्यंत आहे.

**प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की, दोन्ही डीआरआय युनिट्स (१x५० टन आणि २x१०० टन प्रती दिन हे कार्यरत प्रकल्प असून त्याची चाचणी घेण्यात आलेली होती. त्यावेळी धूळ उडाली असेल.

**सदस्य, आयोजक यांनी** मत मांडले की गेले ७-८ वर्षे प्रकल्प बंद होता, त्यामुळे बॉयलरची ट्रायल घेताना धूळ उडाली असेल. हे प्रकल्प प्रवर्तक मान्य करत आहेत. मात्र नियमितपणे उत्पादन प्रक्रिया सुरु झाल्यानंतर प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग व्यवस्था कार्यान्वित करावीच लागेल. त्या सर्व्हरचे एक कनेक्शन मप्रनि मंडळ कार्यालयाच्या मुख्यालयाशी व दुसरे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नवी दिल्ली कार्यालयाशी जोडलेले असते. त्यामुळे मानकांपेक्षा जास्त

हवा प्रदूषण झाल्यास त्वरित ऑनलाईन नोटीस प्रकल्प प्रवर्तकांना, येथील स्थानिक मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त होते.

श्री वाघमारे यांनी आक्षेप नोंदविला की या अगोदरही कंपनी चालू असताना परिसरातील लोकांच्या, शेतक-यांच्या तक्रारी आलेल्या आहेत. त्यांनी सांगितले की ते ग्रामपंचायत सदस्य आहेत. त्यामुळे ग्रामसभेत ठराव मंजूर झालेला होता की सदरहू कंपनीमुळे शेतक-यांचे, गावक-यांचे नुकसान होत आहे. गावाला लागूनच ही कंपनी आहे. पूर्वी लोकांनी पाहिलेले आहे की शेतात, माळरानावर लोखंडाचे कण पडलेले असतात.

**सदस्य, आयोजक यांनी** सांगितले की ग्रामपंचायतीने केलेल्या लेखी ठरावाची व येथे बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली आहे.

४) **<u>श्री चंद्रकांत सूर्यभान नागणे, माजी सरपंच, चिंचोली काटी ग्रामपंचायत, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर</u>**

त्यांनी आक्षेप नोंदविला की, सदरहू कंपनी ही २००४ साली आमच्या गावाच्या हद्दीपासून ५०० मीटर्स अंतरावर आहे. त्यामुळे ह्या कंपनीचा धुळ आमच्या शेतात पडते. शेतातील सर्व पीके वांगी, टॅमोटो, त्यावेळेपासून खराब होतात. येथील शेतक-यांचे प्रचंड नुकसान होत आहे. गेल्या महिन्यात कंपनीने ट्रायल घेतली. पूर्णपणे काळी डस्ट आजूबाजूच्या शेतात पसरली होती. वांगी, टॅमोटे पीकांवर पूर्णपणे धूळ पडलेली होती.

श्री नागणे यांनी पुढे सांगितले की जर परत ही कंपनी चालू झाली, तर चिंचोली काटी ग्रामपंचायतीस या कंपनीचा फायदा झाला पाहिजे. चिंचोली काटी गावातील लोकांना १००% नोक-यांमध्ये प्राधान्य देण्यात आले पाहिजे. गावातील ग्रामस्थ यांना कंपनीतील कामे देण्यात यावी.

**सदस्य, आयोजक यांनी** प्रकल्पापासून चिंचोली काटी हे गाव जवळ असून उपस्थितांनी केलेल्या सूचनांचे अनुपालन करावे हे सूचविले. चिंचोली काटी गावातील कुशल असल्यास त्याची तांत्रीक चाचणी घेऊन प्रकल्पात नोकरीची संधि द्यावी. मात्र अकुशल ग्रामस्थांना प्रकल्पातील विविध अकुशल संवर्गात समाविष्ट करुन घेण्यात यावे. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना बैठकीत आश्वासन देण्याची विनंती केली. प्रकल्प प्रवर्तकांनी गावातील लोकांनाच प्रकल्पात प्राधान्य देण्यात येईल असे आश्वासन बैठकीत दिले. त्यावेळी काही उपस्थितांनी चिंचोलीकाटी गावांबरोबरच अकोले काठी, बिबिधाडफळ परिसरातील इतर गावांनाही प्राधान्य देण्यात यावे ही मागणी केली.

**सदस्य, आयोजक यांनी** बैठकीत महिलावर्ग उपस्थित आहेत, त्यांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

५) **<u>श्री मारुती उध्दव भोसले उर्फ दादा भोसले, राहणार-चिंचोली काटी, तालुका-मोहोळ, जिल्हा - सोलापूरः-</u>**

ही कंपनी २००४ साली सुरु झाली. आमचा अनुभव या कंपनीविषयी चांगला आहे. उत्पादन करत असताना जी धूळ निघते व त्याचप्रमाणे बॉयलर चालू केल्यानंतर जो धूर निघतो, त्याचा खतरनाक परिणाम आमच्या गावावर होत आहे. गावातून चालत येताना डोळ्यात लोखंडी कण जातात व रस्त्यावर एवढी धूळ असते की चालणे मुश्किल होते. मोटर सायकल चालविता येतच नाही. ही धूळ २-३ कि.मी. एवढी लांब उडते. रात्रीच्या वेळी श्वासोश्वास करताना त्रास होतो. आरोग्यासाठी हे फारच त्रासदायक आणि हानीकारक आहे. कंपनीने या अडचणींचा विचार करुन त्यावर उपाययोजना त्वरित करणे गरजेचे आहे. या कंपनीचा भरपूर त्रास येथील लोकांना सहन केलेला आहे. तर पुढे तसा त्रास होऊ नये अशी आमची इच्छा आहे. सदस्य, आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत उत्तर देण्याची सूचना केली.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** उत्तर दिले की २००४-२०१४ मध्ये कंपनी व्यवस्थापकांनी उभारलेली प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा पूर्णपणे गंजलेली होती. आती अत्याधुनिक प्रदषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रकल्पात नवीन चिमणी, ईएसपी, बॅग फिल्टर बसविण्यात आलेले असून बैठकीत सांगितल्याप्रमाणे ऑनलाईन मॉनिटरींग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. प्रकल्पाचे आश्वासन आहे की प्रकल्पात Zero Percent Pollution होईल.

६) **<u>श्री महेश भोसले, राहणार-चिंचोली काटी, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

आपल्या कंपनीत ट्रायल बेसवर जे बाहेरच्या राज्यातील कामगार आहेत, त्याला आमचा विरोध आहे. शासकीय नियमांप्रमाणे स्थानिक कामगार घेणे बंधनकारक असताना ९९% लोक हे मध्यप्रदेश, यु.पी.,बिहारमधील आहेत. त्यामुळे स्थानिक कामगारांवर अन्याय होतो.

**यावेळी सदस्य,आयोजक यांनी** येथे प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा केली की आताच आपण स्थानिक व चिंचोलीचे कामगारच आहेत असे उत्तर दिले व तर बाहेरिल कामगार मध्यप्रदेश, यु.पी.,बिहारमधील कशासाठी आहेत? ते कंत्राटी आहेत की प्रकल्पात कामावर आहेत?

**प्रकल्प प्रवर्तकांनी** उत्तर दिले की प्रकल्पात जे काम चालू आहे ते Specialised Work आहे. १६००° तापमानावर काम आहे. स्थानिकांना प्राधान्य देणे हेच प्रकल्पाचे धोरण आहे. भविष्यातही तेच धोरण राहिल.

त्यावेळी श्री महेश भोसले यांनी आक्षेप नोंदविला की येथील कंत्राटदारसुध्दा बाहेरील आहेत. यावेळी सदस्य, आयोजक यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना केली की जरी एखादे Specialised Work असेल, तर ते सोडून इतर कामांना व प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. महाराष्ट्र शासनाचा ऊर्जा व कामगार विभागाच्या आदेशानुंसार ८०% भूमीपुत्रांनाच प्रकल्पात रोजगाराची संधि देणे गरजेचे आहे.

श्री भोसले यांनी आक्षेप नोंदविला की प्रदूषण या कंपनीतून भरपूर होत आहे. तरी चिंचोली काटीच्या लोकांचे प्रदूषणाचे प्रश्न जोपर्यंत सोडविले जात नाही, तोपर्यंत ही कंपनी चालू करण्यात येऊ नये. अन्यथा आम्हांला जनआंदोलन करावे लागेल.

त्यांनी पुढील मुद्दा वाहतुक संदर्भात उपस्थित केला. चिंचोली काटी, अकोले काठी आणि बिबि धरफळ येथील स्थानिकांकडील वाहने ही प्रकल्पातील विविध कामांसाठी भाड्याने घेण्यात यावी.

श्री भोसले यांनी आक्षेप नोंदविला की आपल्या कंपनीत सीएसआर निधी ही दहा लाख दाखविलेला आहे. तर कंपनी चालू होण्यापूर्वी त्या सीएसआर निधीतून लाईट, पाणी, रस्ता, ड्रेनेज, शाळेची व्यवस्था या सर्व चिंचोली काटी गावासाठी करण्यात याव्यात. नंतरच कंपनी चालू करण्यात यावी.

यावेळी **सदस्य, आयोजक यांनी** प्रकल्प प्रवर्तकांना किती सीएसआर निधी राखून ठेवला व तो एका गावात का सर्व गावात समान खर्च करणार याबाबत विचारणा केली. त्यांनी सूचविले की प्रकल्प प्रवर्तक यांनी दहा लाख सीएसआर निधी हा तीन्ही गावात म्हणजे चिंचोली काटी, बिबिधारफळ, अकोले काठी या गावात वापरण्यात यावा. त्यावेळी श्री भोसले यांनी मागणी केली की चिंचोली काठी गावाने यासाठी रक्त सांडले असून आमच्या जमिनी गेल्या, कंपनी चिंचोली काठी गावात आहे, प्रदूषणाचा त्रास हा चिंचोली काठी गावच्या रहिवाशांना जास्त होतो. म्हणून ८०% सीएसआर निधी हा चिंचोली काठी गावासाठी देण्यात यावा. त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाने या कंपनीवर विशेष लक्ष ठेवण्याची सूचना केली.

हे मी जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र जनरल आणि माथाडी कामगार सेना, सोलापूर या नात्याने सांगत आहे. त्यांनी पुढे सांगितले की कंपनी जर माथाडी कामगार लावणार असतील, तर त्याचा विचार

व्हावा. माथाडी कामगारांना कंपनीत प्राधान्य देण्यात यावे. या उपस्थित प्रश्नांची जर उत्तरे मिळत नसतील तर कृपया कंपनी चालू करु नये. जर कंपनी चालू केली, तर या स्थानीक मुद्दयांसाठी कंपनी चालू केली त्याविरुध्द जनआंदोलन छेडावे लागेल

७) **<u>श्री मारुती पांडुरंग पवार, राहणार-चिंचोली काटी, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूरः-</u>**

ही कंपनी सर्वांना बरोबर घेऊन चालत होती. ती व्यवस्थित पुढे चालावी हीच अपेक्षा आहे.

८) **<u>श्री आतीश यलप्पा गवळी, राहणार-अकोले काटी, तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा---सोलापूरः-</u>**

सादरीकरणात सांगितले की १० कि.मी, पर्यंत वन्यजीव अभायारण्य नाही. प्रकल्पापासून ४ कि.मी. अंतरावर माळढोक पक्षी अभयारण्य आहे. ते पर्यावरण विषयक अतिसंवेदनशील क्षेत्र आहे.

त्यांनी अध्यक्ष यांना विनंती केली की कालच पत्रक काढण्यात आले की एकच माळढोक पक्षी राहिलेला असून त्याच्या मागे फोटो काढण्यास गेलात किंवा त्याच्या मागे गेलात तर गुन्हा दाखल होईल. तर सदरहू प्रकल्पासाठी परवानगी घेण्यात आली का? त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की या भागातील अनेक कंपन्या ह्या प्रदूषण उत्पन्न करतात. यावेळी पर्यावरणविषयक समितीने संबंधित व्यक्तीस जनसुनावणी ज्या कंपनीची आहे, तिच्या पर्यावरणविषयक प्रश्न विचारण्याची सूचना केली.

**आयोजक यांनी** प्रकल्पापासून माळढोक पक्षी अभयारण्य किती अंतरावर आहे याची चौकशी केली असता पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पूर्वी १० कि.मी.अंतर अनिवार्य होते, आता ५.० कि.मी. केले असून अधिसूचित औद्योगिक क्षेत्रासाठी येथे एमआयडीसी ०.५ कि.मी. अंतराचे निर्देश आहेत.

त्यावेळी श्री गवळी यांनी अध्यक्षा यांना आक्षेप नोंदविला की आम्हां स्थानिकांना तेथे जाऊ दिले जात नाही, तर या कंपनीच्या धुरामुळे आणि धुळीमुळे माळढोक पक्षांना त्रास होणार नाही का?

सदस्य, आयोजक बैठकीचा परामर्श घेताना सर्व प्रश्नकर्त्यांची नांवे वाचून दाखविली. त्यांनी सांगितले की ह्या संपूर्ण बैठकीची व्हिडिओ शुटींग घेण्यात आलेली असून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथील तज्ज्ञ समिती याबाबत सर्व विषय तपासून निर्णय घेते. जरी येथे एखादी मुद्दा राहिला असला तरी तेथील तज्ज्ञ त्याबाबत अभ्यास करुनच निर्णय घेतात.

त्यावेळी काही उपस्थितांनी स्थानिकांना माळढोक क्षेत्रात प्रवेश करुन देत नाहीत, तर सदरहू प्रकल्पाच्या धुळीमुळे पक्षांना त्रास कसा होणार नाही? आमची गुरे गेल्यास वनखाते ते गुरे जप्त करतात. तेथे गावक-यांना शेती करण्यास परवानगी देत नाहीत. तर या प्रकल्पास परवानगी मिळू नये. बाहेरील कंपन्या आणून आमच्या जीवावर खपवणार. प्रदूषणाबाबत गावक-यांनी बराचवेळा निवेदने दिलेली असून त्यावर पुढील कारवाई होत नाही. येथील प्रदूषणाचा त्रास येथील परिसरातील लोक, जनावरे व निसर्ग ह्यांना भोगावा लागतो व त्यात या कंपनीमुळे भर पडेल.

**अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की बैठकीत जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, त्यात एक माळढोक अभयारण्याविषयी, तर दुसरा प्रदूषण नियंत्रण कायद्यांच्या अंमलबजावणी संदर्भात आहे. तर प्रकल्प परिसराच्या ०५ कि.मी. परिघात कुठलेही अभयारण्य नाही हे जे अहवालात आहे, ते वगळण्याचे निर्देश पर्यावरण सल्लागार यांना देण्यात आलेले आहेत. मात्र सदरहू कंपनी ही एकटी नसून ती अधिसूचित एमआयडीसी क्षेत्रात कार्यरत आहे. त्यामुळे या कंपनीबरोबरच इतर अनेक कंपन्या येथे कार्यरत आहेत. शासनाने सर्व बाबींचा विचार करुनच एमआयडीसीला मान्यता दिलेली आहे. जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येते व तज्ज्ञ समिती ही मान्यता देताना आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेत असते.

**अध्यक्षा यांनी** सांगितले की आपण येथील विविध कंपन्यांकडून होणा-या प्रदूषणाबाबत आक्षेप सांगितले. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पासही प्रदूषणाचे मानके पाळावेच लागतील याची जाणीव झालेली आहे. यावेळी काही उपस्थितांनी परिसरातील इतर उद्योगांच्या प्रदूषणाबाबत बोलण्यास सुरवात केली असता अध्यक्षा यांनी फक्त संबंधित कंपनीविषयीच सूचना/आाक्षेप करण्यास सांगितले.

९) **श्री केशव जांभळे, अकोले काटी, तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूरः- जिल्हाध्यक्ष, प्रहार औद्योगिक कामगार संघटना,सोलापूर जिल्हाः-**

गेले कित्येक वर्षे बंद असलेली कंपनी सुरु करत आहात, म्हणून तुमचे अभिनंदन. शिवाय हे अधिसूचित एमआयडीसी क्षेत्र आहे. त्यामुळे येथे कंपनी चालू करणे सर्वांना मान्य आहे. मात्र कंपनी व्यवस्थापन व गावकरी यांच्या समन्वयासाठी कंपनीतर्फे एक समिती गठित करता येईल काय? तेथे हे सर्व विषयांवर तोडगा निघावा. आपली इच्छा आहे कंपनी चांगली चालू व्हावी, पर्यावरण संरक्षण व्हावे व गावक-यांची प्रगती व्हावी, त्रास होऊ नये. त्या समितीने घेतलेले निर्णय सर्वांना मान्य झाले पाहिजेत. ही माझी सूचना आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी याबाबत निश्चितच विचार करण्याचे आश्वासन दिले.

**सदस्य, आयोजक यांनी** सांगितले की बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यावतीने बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(अजित पाटील)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सोलापूर

**(शमा पवार)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा - सोलापूर